# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** मिरज शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0031 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/02/2026 06:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 31/01/2026

**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 31/01/2026

**Time From (वेळेपासून):** 19:31 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/02/2026 **Time (वेळ):** 05:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 008

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/02/2026 06:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मिरज ग्रामीण पोलीस स्टेशनचे ,समोरे बाजुस,टी कफे शप येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्रीमती यास्मीन इनामदार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली,मिरज शहर,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली,मिरज शहर,सांगली, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527904700

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल शिवाजी गुरव | | वडील का नाम : शिवाजी गुरव | 1. वंदावन बंगला, विवेकानंद कलनी,मिरज, ता मिरज जि सांगली ,मिरज शहर,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | जयवंत ईश्वर नागरगोजे | | वडील का नाम : ईश्वर नागरगोजे | 1. नागरगोजेवाडी, बेडग,,ता मिरज, जि सांगली,मिरज शहर,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 01.02.2026

मी श्रीमती यास्मीन इनामदार, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.नं 9527904700.

सरकारतर्फे फिर्यादी होवून देते फिर्यादी जबाब की, मी पोलीस उप अधीक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.

दि. 30/01/2026 रोजी 16.33 वा चे सुमारास तक्रारदार श्री.शिवाजी श्रीकांत महाडीक रा.शिपुर ता.मिरज यांनी आम्हास संपर्क करून त्यांची मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथील श्री. गुरव सहा.पोलीस निरीक्षक व खाजगी इसम नागरगोजे यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळविली. त्यावेळी मी तक्रारदार यांना दि.31/01/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता सांगली मिरज रोड येथील क्रिडा संकुल सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी दि. 30/01/2026 रोजी मा. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, विभागीय कार्यालय सांगली शहर यांना पत्रव्यवहार करून वर्ग-2 चे एक अधिकारी व उपप्रादेशिक मोटार परिवहन विभाग सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे एक कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विनंती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना दि.31/01/2026 रोजी सकाळी 09.30 वाजता एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.

दि. 31/01/2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच सकाळी 09.45 वा चे सुमारास एसीबी कार्यालयात आमचे समक्ष हजर झालेत. त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवक व खाजगी इसम यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.

त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/अजित पाटील, असे डिजिटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, प्रिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अँथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन खाजगी स्विफ्ट वाहन क्र.एमएच-10-सीएक्स-9096 मधून कार्यालयातून 09.50 वा चे सुमारास रवाना होवून स्टेशन चौक, पुष्पराज चौक, सांगली मिरज रोडने भोकरे कॉलेज मिरज येथील क्रिडा संकुल सांगली येथे सुरक्षित ठिकाणी 10.10 वा चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार महाडीक यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे काही वेळाने तक्रारदार श्री. महाडीक हे त्यांचेकडील होंडा मोपेड क्र. एमएच-10-सीडब्ल्यु-0960 वरून आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. किर्तीकुमार गजानन पाटील यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. नितीन विलास कोकणे यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.

त्यानंतर तक्रारदार श्री. महाडीक यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले मिरज ग्रामीण पो.ठाणे येथील गुरनं.493/2022 गुन्हयामध्ये तक्रारदार यांचा

पुर्वी मंजूर असलेला अटकपुर्व जामिन नामंजूर करण्यासाठी न्यायालयात पाठविलेल्या अहवालामध्ये मदत करण्यासाठी व तक्रारदार यांचेविरूध्द हद्दपारी प्रस्तावाची अंमल बजावणी न करता प्रतिबंधात्मक कारवाई करून सोडण्यासाठी लोकसेवक गुरव सहा.पोलीस निरीक्षक व खाजगी इसम नागरगोजे यांनी तक्रारदार यांचेकडे 8,00,000/- रूपये लाचेची मागणी केली असलेबाबत हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक यांनी त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.

सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये "मी बिरोबा मंदीर शेजारी, शिपूर, ता. मिरज, जि.सांगली माझे कुटुंबासह एकत्रात राहणेस आहे. माझे विरुद्ध रंजीत लालासो देसाई यांनी दिले तक्रारी प्रमाणे मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे दाखल गुरनं 493/2022 भा.दं.वि.सं. कलम 307, 324, 506 सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम 135, 37(1), (3) व शस्त्र अधिनियम कलम 4, 27 नुसार गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यातुन मला अटक पुर्व जामीन मिळाला आहे.

माझी व रंजीत लालासो देसाई यांची किरकोळ कारणावरुन पुन्हा भांडणे झाल्याने माझे विरुद्ध मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे एन.सी दाखल झाली आहे. या एन.सीचे आधारे माझा अटक पुर्व जामीन रद्द करण्यासाठी मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक, सुनिल शिवाजी गुरव यांनी सत्र न्यायालय सांगली येथे अहवाल पाठवला आहे. त्याची सुनावणी सत्र न्यायालय सांगली येथे सुरु आहे.

माझा अटकपुर्व जामीन रद्द होण्यासाठी पाठवलेल्या अहवालचे अनुषंगाने मला मदत करण्यासाठी तसेच माझे विरुद्ध मा. पोलीस अधीक्षक सांगली यांनी प्रांताधिकारी मिरज यांचेकडे पाठविलेल्या हद्दपारी प्रस्तावाची अंमल बजावणी न करता प्रतिबंधात्मक कारवाई करुन मदत करण्यासाठी मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक, सुनिल शिवाजी गुरव यांनी सुमारे एक महीन्यापुर्वी माझ्याकडे 800000/- रुपये लाचेची मागणी केली. मी वेळोवेळी मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे जावुन गुरव साहेबांची भेट घेवुन मदत करणे बाबत विनंती केली त्यावेळी सुद्धा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली.

त्यानंतर जयवंत ईश्वर नागरगोजे, रा. बेडग यांनी फोन करुन मिरज ते बेळंकी जाणारे रोडवरील रामनगर येथे मला बोलावुन घेवुन मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक, गुरव यांना सांगुन अटकपुर्व जामीन नामंजुर करण्यासाठी कोर्टामध्ये सुरु असले सुनावणीमध्ये व प्रांताधिकारी मिरज यांचेकडे पाठविलेल्या हद्दपारी प्रस्तावाची अंमल बजावणी न करता प्रतिबंधात्मक कारवाई करुन मदत करण्यासाठी मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक, गुरव यांचेकरीता 8,00,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच वारंवार मला माझे मोबाईल नंबर – 7276015955 याचेवर त्यांचे मोबाईल नंबर – 7875661151 यावरुन मला वारंवार फोन करुन सहा. पोलीस निरीक्षक, गुरव यांना सांगुन काम करुन देण्याची हमी दिली आहे.

मी मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक, गुरव व नागरगोजे, रा. बेडग यांना 8,00,000/- रुपये नाही दिले तर ते माझा अटक पुर्व जामीन नामंजुर करण्यासाठी न्यायालयात सुरु असले सुनावणीमध्ये मला मदत करणार नाहीत व हद्दपार प्रकरणामध्ये मदत करणार नाहीत याची मला खात्री आहे. मला मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे सहा. पोलीस निरीक्षक, गुरव व नागरगोजे, रा. बेडग यांना लाच देण्याची इच्छा नाही. मी मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे जावुन सहा. पोलीस निरीक्षक, गुरव व नागरगोजे, रा. बेडग यांची भेट घेणार आहे. सहा. पोलीस निरीक्षक, गुरव व नागरगोजे, रा. बेडग हे माझ्याकडे 8,00,000/- रुपये लाचेची मागणी करणार याची मला खात्री आहे.

माझेत व सहा.पोलीस निरीक्षक, गुरव व नागरगोजे, रा. बेडग यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार नाही तसेच आमचेत कोणताही भांडण तंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विनंती.." अशी हकीकत अर्जामध्ये नमूद आहे.

त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेवक गुरव सहा.पोलीस निरीक्षक व खाजगी इसम नागरगोजे यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक व पंच क्र.1 किर्तीकुमार पाटील यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना

दिल्या.

त्यानंतर मी 10.46 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना दिले सुचनांची उजळणी करून दिली.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 11.08 वा सुरु करुन तो तक्रारदार यांना त्यांचे गळ्यामध्ये अडकविणेच्या इशारा केला त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक यांनी रेकॉर्डर हा त्यास असले लेसच्या सहाय्याने त्यांचे गळ्यामध्ये अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 पाटील यांना मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक हे त्यांचेकडील होंडा मोपेड क्र. एमएच-10-सीडब्ल्यु-0960 वरून पंच नं.1 पाटील यांचेसह रवाना झाले

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. महाडीक व पंच नं.1 पाटील असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 11.35 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.

त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. पाटील यांना, लोकसेवक व खाजगी इसम यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे बाहेर असले टी कॉफी शॉप येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी खाजगी इसम नागरगोजे यांना फोन केला. त्यावेळी नागरगोजे यांनी ते आष्टा येथे आले असल्याचे सांगून येण्यास थोडा वेळ लागणार असल्याचे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी नागरगोजे यांना चर्चा करणेसाठी भेटण्याची विनंती करून तडीपारीच्या केसमध्ये साहेबांना सहकार्य करण्यास सांगणेची विनंती केली. त्यावेळी नागरगोजे यांनी तक्रारदार यांना "तुमची काय असतीलते प्रकरण काढून घेतो...... साहेब तुमच्या केसला पण धक्का लावणार नाहीत हयो शब्द आहे माझा.... माझ्यावर विश्वास ठेवा... मी बोलणे केलेय साहेबां सोबत" असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना किती वेळ लागेल असे विचारले असता नागरगोजे यांनी आलेनंतर फोन करीत असलेचे सांगून फोन कट केला. त्यानंतर तक्रारदार व मी असे टी कॉफी शॉप येथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत पंच नं.1 पाटील यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.1 पाटील यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. महाडीक व खाजगी इसम नागरगोजे यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाई मध्ये, खाजगी इसम नागरगोजे हे बाहेरगावी असलेने तसेच त्यांनी आलेनंतर तक्रारदार यांना फोन करीत असलेचे सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार महाडीक यांना खाजगी इसम नागरगोजे यांचा फोन येण्याची वाट पाहण्याचे निश्चित करून त्यानंतर पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर खाजगी इसम नागरगोजे यांचा मो.क्र. 7875661151 यावरून 12.10 वा चे सुमारास फोन आला असल्याचे आम्हास सांगितले. त्यानंतर मी तक्रारदार महाडीक यांना दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार यांनी नागरगोजे यांचा कॉल स्विकारून तो स्पिकर मोडवर घेणेच्या सुचना दिल्या. व त्यानंतर मी लागलीच 12.10 वा चे सुमारास डिजीटल व्हाईस रेकॉर्  सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी नागरगोजे यांनी "मिरज मध्ये मिरची हॉटेल येथे आलो असल्याचे सांगितले" त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना साहेब कुठे आहे हे विचारून पुन्हा फोन करण्यास सांगून कॉफी शॉप जवळ येत असलेचे सांगितले. त्यावेळी नागरगोजे यांनी ठिक आहे असे म्हणून फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.   त्यानंतर तक्रारदार श्री. महाडीक व खाजगी इसम नागरगोजे यांचेतील फोनवर झालेले सदर संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 003 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलवर खाजगी इसम नागरगोजे यांचा मो.क्र. 7875661151 यावरून 12.12 वा चे सुमारास फोन आला असल्याचे आम्हास सांगितले. त्यानंतर मी तक्रारदार महाडीक यांना दिले सुचनेप्रमाणे तक्रारदार यांनी नागरगोजे यांचा कॉल स्विकारून तो स्पिकर मोडवर घेणेच्या सुचना दिल्या. व त्यानंतर मी लागलीच 12.12 वा चे सुमारास डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार यांचेसमोर धरला. त्यावेळी नागरगोजे यांनी तक्रारदार यांना "त्या कॉफी सेंटर पाशी या...हायत साहेब" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "आलोच" असे म्हणून फोन कट केला. लागलीच मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्यानंतर तक्रारदार श्री. महाडीक व खाजगी इसम नागरगोजे यांचेतील फोनवर झालेले सदर संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 004 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये खाजगी इसम नागरगोजे यांनी तक्रारदार यांना मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे समोरील असे कॉफी शॉप येथे भेटण्यास बोलविले असल्याने व गुरव साहेब देखील हे पोलीस ठाणेस हजर असलेने खाजगी इसम नागरगोजे व गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांचेविरूध्द पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक व पंच क्र.1 किर्तीकुमार पाटील यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.16 वा सुरु करुन तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये अडकविणेच्या इशारा केला त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक यांनी रेकॉर्डर हा त्यास असले लेसच्या सहाय्याने त्यांचे गळयामध्ये अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 पाटील यांना मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक हे त्यांचेकडील होंडा मोपेड क्र. एमएच-10-सीडब्ल्यु-0960 वरून पंच नं.1 पाटील यांचेसह रवाना झाले

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. महाडीक व पंच नं.1 पाटील असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 13.05 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. पाटील यांना, लोकसेवक व खाजगी इसम यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे बाहेर असले टी कॉफी शॉप येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी खाजगी इसम नागरगोजे यांना फोन करून कॉफी शॉप येथे आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी काही वेळाने एक पोलीस युनिफॉर्म मधील अधिकारी व एक अनोळखी इसम असे पोलीस स्टेशन मधून बाहेर चालत येवून कॉफी शॉप येथे तक्रारदार यांचेजवळ येवून चर्चा करू लागले. त्यावेळी पोलीस युनिफॉर्म मधील अधिकारी हे गुरव सहा.पोलीस निरीक्षक व अनोळखी इसम हे खाजगी इसम नागरगोजे असल्याची माझी खात्री झाली. त्यावेळी तक्रारदार यांनी गुरव यांना "साहेब मला खर सांगा तडीपारीचा आणि जामीन कॅन्सलचा विषय हाय" असे विचारले असता गुरव यांनी "110 ची कारवाई करुया...म्हणजे काय चाप्टर केस करूया....तो प्रस्ताव आपोआप कॅन्सल होतो...हद्दपारीचा...... एकतर हद्दपारीचा प्रस्ताव मंजूर करून घ्या नायतर चाप्टर केस करा...सगळ करायाच तुझ्यासाठी..." असे म्हणाले. त्यावर खाजगी इसम नागरगोजे यांनी तक्रारदार यांना "मी शपथ घेवून सांगतो साहेब तुमच्या केसाला धक्का लागून देत नाही" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व गुरव यांचेमध्ये तडीपारीच्या प्रस्तावाबाबत चर्चा झाली. त्यावेळी खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना "तुम्हाला सायबांकडन जेवढ होता येईल तेवढ तुम्हाला सहकार्य करू" असे म्हणाले. त्यावर गुरव यांनी तक्रारदार यांना "तुझ्याकडून होणार आहे का ते मला सांग" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "आता तुम्ही जेवढ सांगितलाय ना...त्यातला टप्पा करून द्या" असे म्हणाले. त्यावर खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना "आज देतो म्हणला होतास ना" असे विचारले असता तक्रारदार यांनी "देतो की" असे म्हणाले. त्यावर नागरगोजे यांनी "देवून टाका की मग....." असे म्हणाले. त्यानंतर गुरव यांनी तक्रारदार यांना "तडीपारीचा विषयामध्ये आजच 110 ची बॉन्ड करून घेवून विषय संपून जाईल..." असे म्हणाले.

त्यानंतर गुरव यांनी तक्रारदार यांना "मी रिस्क घेतोय काम करतोय.....त्याचा मोबदला भेटला पाहिजे.....तु पैशे देतोय मला... का देतोय?" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "काम व्हाव म्हणून" असे म्हणाले. त्यावर खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना "आणुन दे" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "एक तासाभरात हयांच्याकड देवू का तुमच्याकड देवू" असे दोघांना विचारले असता नागरगोजे यांनी "कुणाकड पण द्या" असे म्हणाले. त्यानंतर गुरव यांनी पुन्हा तक्रारदार यांचेशी 110 च्या प्रतिबंधात्मक कारवाई बद्दल चर्चा केली. त्यावेळी तक्रारदार यांनी गुरव यांना "काय मी घेवून येवू का इथच" असे विचारले असता गुरव यांनी "घेवून ये की" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "आज एक 2 लाख रूपये देतो" असे म्हणाले असता गुरव यांनी "काय करायच कर....खुप मार्ग आहेत बाहेर पडायला तुला... तु येत नाही आमच्याकडे" असे म्हणाले. त्यावेळी नागरगोजे यांनी तक्रारदार यांना "तुम्हाला काय सांगितलय सायबांकडन आपण करून घेवू" असे म्हणाले. त्यावर गुरव यांनी "हद्दपारीचा प्रस्ताव आपोआपच रद्द करता येतो प्रतिबंधात्मक कारवाई केली की" असे म्हणाले. त्यानंतर गुरव हे तेथून निघून गेले.

त्यानंतर तक्रारदार व नागरगोजे हे तक्रारदार यांचेविरूध्दचे तडीपार प्रस्तावबाबत चर्चा करू लागले. त्यावेळी नागरगोजे यांनी त्यांना "चिंता करू नका...मी सगळ सायबास्नी बोललोय तडीपारचा...तुमच्या केसाला पण धक्का लागू देणार नाही" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "ठिक हाय...एक तासाभरात येतो" असे म्हणाले. त्यावर

नागरगोजे यांनी “ठिक हाय बघा जेवढ होईल तेवढ द्या” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी “मी डायरेक्ट सायबाकड देवू का तुमच्याकड देवू?” असे विचारले असता नागरगोजे यांनी “कुणाकड बी द्या..आम्ही साहेब एकच हाय” असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार व मी असे तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो” वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर तक्रारदार श्री. महाडीक, लोकसेवक गुरव व खाजगी इसम नागरगोजे यांचेतील समक्ष झालेले सदर संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 005 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेवक गुरव यांनी तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले गुन्हयामध्ये तक्रारदार यांचा पुर्वी मंजूर असलेला अटकपुर्व जामिन नामंजूर करण्यासाठी न्यायालयात पाठविलेल्या अहवालामध्ये मदत करण्यासाठी व तक्रारदार यांचेविरूध्द हद्दपारी प्रस्तावाची अंमल बजावणी न करता प्रतिबंधात्मक कारवाई करून सोडण्यासाठी कामा संदर्भात चर्चा करून तक्रारदार यांचेकडे “मोबदला द्यायला लागणार” असे म्हणून लाचेची मागणी केली. तसेच खाजगी इसम नागरगोजे यांनी तक्रारदार यांचेवर प्रभाव पाडून तक्रारदार यांचे काम लोकसेवक गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांचेकडून करून देणेची हमी देवून तक्रारदार यांना लाच रक्कम देण्याकरीता प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्न झाले.

परंतू लोकसेवक गुरव अथवा खाजगी इसम नागरगोजे यांनी तक्रारदार यांचेकडे नेमकी किती लाच रक्कमेची मागणी केली हे स्पष्ट न झाल्याने आम्ही सर्वानुमते पुन्हा तक्रारदार व पंच नं.1 पाटील यांना लोकसेवक गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांचेकडे मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे पाठवून पडताळणी करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक व पंच क्र.1 किर्तीकुमार पाटील यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 14.16 वा सुरु करुन तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये अडकविणेच्या इशारा केला त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक यांनी रेकॉर्डर हा त्यास असले लेसच्या सहाय्याने त्यांचे गळयामध्ये अडकविला. त्यानंतर तक्रारदार व पंच नं.1 पाटील यांना मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांचे भेट घेणेकामी रवाना केले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक हे त्यांचेकडील होंडा मोपेड क्र. एमएच-10-सीडब्ल्यु-0960 वरून पंच नं.1 पाटील यांचेसह रवाना झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. महाडीक व पंच नं.1 पाटील असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 15.07 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला. त्यानंतर मी, पंच नं 1 श्री. पाटील यांना, लोकसेवक गुरव यांची भेट झाली का? तक्रारदार व त्यांच्या मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, पंच नं 1 यांनी हकीगत सांगीतली की, “आपण दिले सुचनेप्रमाणे मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचेकडील मो.सा वरून रवाना होवून मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे बाहेर असले टी कॉफी शॉप येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांना फोन करून बाहेर आलो असल्याचे सांगितले. त्यावेळी गुरव साहेबांना तक्रारदार यांना पोलीस ठाणेचे बाहेरील मेन रोडवर थोडे पुढे बोलवले. त्यावेळी आम्ही तेथे जावून गुरव साहेबांची भेट घेतली. त्यावेळी तक्रारदार यांनी गुरवशी त्यांचे प्रलंबित कामा संदर्भात चर्चा केली. त्यावेळी गुरव यांनी तक्रारदार यांना “बर काय आज होणार हाय काय तुझ्याकडून” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना “जरा वेळ द्या....आज किती करू सांगा?” असे विचारले असता गुरव यांनी “मला काय सगळेच दे म्हणणार मी......किती करणार ते तरी सांग” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना “तुम्ही सांगा तेवढ करतो” असे म्हणाले. त्यावर गुरव यांनी “तुला योग्य तेवढ कर बस..... जे शक्य होईल ते कर....तुला शक्य तेवढ दे” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी गुरव यांना “नागरगोजे साहेब उगच जास्त सांगाय लागलेत......आठ लाख रूपये होईल ते भिती घालाय लागल्यात” असे म्हणाले. त्यावर गुरव यांनी “आता काय तु किती देणार सांग” असे तक्रारदार यांना विचारले. त्यावर तक्रारदार यांनी गुरव यांनाच रक्कम सांगणेची विनंती केली. त्यावेळी गुरव यांनी तक्रारदार यांना “लाख रूपये कमी दे जा...जा.....लाख भर कमी दे” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी “सात लाख रूपये?” असे विचारले असता गुरव यांनी “हा” असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना “पाच देतो की?” असे म्हणाले असता गुरव यांनी “तुझही न्हाय...माझही न्हाय... साडे सहा लाख रूपये देवून टाक...जा संपवून टाक विषय” असे म्हणून तक्रारदार यांचेकडे साडे सहा लाख रूपये लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी गुरव यांना आणखीन रक्कम कमी करण्याची विनंती केली असता गुरव यांनी तक्रारदार यांना “सहा पर्यंत कर जा...संपवून टाक जा विषय....मी संध्याकाळी वाट बघतो तुझी” असे म्हणून तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 6,00,000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी “हा फोन करतो” असे म्हणून तक्रारदार व मी असे तेथून रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो” वगैरे हकीकत पंच नं.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक यांना पडताळणीची हकीकत विचारली असता तक्रारदार यांनी पंच नं.1 पाटील यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार श्री. महाडीक व लोकसेवक गुरव यांचेतील समक्ष झालेले सदर संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 006 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेवक गुरव सहा. पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले गुन्हयामध्ये तक्रारदार यांचा पुर्वी मंजुर असलेला अटकपुर्व जामिन नामंजूर करण्यासाठी न्यायालयात पाठविलेल्या अहवालामध्ये मदत करण्यासाठी व तक्रारदार यांचेविरूध्द हद्दपारी प्रस्तावाची अंमल बजावणी न करता प्रतिबंधात्मक कारवाई करून सोडण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 8,00,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 6,00,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक गुरव यांनी तक्रारदार यांना संध्याकाळ पर्यंत रक्कमेची जुळणी करण्यास सांगून आलेनंतर फोन करण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही सायंकाळी 19.00 वा नंतर लोकसेवक श्री.गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर मी तक्रारदार महाडीक यांना लोकसेवक श्री.गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांनी मागणी केलेली 6,00,000/- रूपये हजर करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी रक्कमेची जुळणी करून येतो असे म्हणून ते निघून गेले.

त्यानंतर आम्ही सापळा कारवाईकामी कार्यालयाकडील अंमलदार रामहरी वाघमोडे, सलीम मकानदार व चंद्रकांत जाधव यांना संपर्क करून त्यांना क्रिडा संकुल सांगली येथे हजर राहणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तीनही अंमलदार काही वेळाने आमचे समक्ष हजर झाले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार हे देखील आमचे समक्ष हजर झाले. व त्यांनी त्यांचेकडे 1,00,000/- रूपये इतकी रक्कम उपलब्ध झाली असल्याचे सांगून 500/- रूपये दराचे 200 नोटा असे एकुण 1,00,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचासमक्ष हजर केले. त्यावेळी आम्ही उर्वरित 5,00,000/- रूपये कार्यालयाकडील डमी नोटा वापरण्याचे निश्चित केले व डमी नोटांचे 500/- रूपये दराच्या प्रत्येक बंडल मध्ये 100 नोटा असे एकुण 10 बंडल असे 5,00,000/- रूपये आम्ही पंचासमक्ष हजर केले. त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 1,00,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या व कार्यालयाकडील डमी नोटांना पथकातील अंमलदार पोह/मकानदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/- रूपये दराचे प्रत्येक बंडल मध्ये 100 नोटा असे एकुण दोन बंडल व कार्यालयाकडील 500/- रूपये दराचे प्रत्येक बंडलमध्ये 100 नोटा असे 10 बंडल असे एकुण 6,00,000/- रूपये नोटांचे एकुण 12 नोटांचे बंडल रब्बरच्या सहाय्याने एकत्रित करून ते एका वर्तमानपेपरमध्ये गुंडाळून सदर नोटांचे बंडल तक्रारदार यांचे मोपेडच्या डिक्कीमध्ये लोकसेवक गुरव यांनी मागणी केल्यानंतर त्यांना देणेसाठी ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार मकानदार यांना क्रिडा संकुल सांगली येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.

त्यानंतर मी 18.55 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये व सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले आहे.

तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. गुरव यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.

त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 19.31 वाजता सुरू करून तो तक्रारदार यांना त्यांचे गळयामध्ये अडकविणेच्या इशारा केला त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक यांनी रेकॉर्डरला असले लेसव्दारे तो गळयामध्ये अडकवून लोकसेवक गुरव यांची भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. महाडीक

व पंच नं. 1 श्री. पाटील असे तक्रारदार यांचेकडील मोपेड मो.सा वरून रवाना झालेत.
त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 श्री. कोकणे, पोह/रामहरी वाघमोडे, पोशि/अजित पाटील असे लॅपटॉप, पिं्रटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन खाजगी स्विफ्ट वाहन क्र. एमएच-10-सीएक्स-9096 मधून रवाना झालो. व पोना/प्रितम चौगुले व पोशि/680 चंद्रकांत जाधव असे त्यांचेकडील मो. सा. वरून रवाना झालेत. पोह/मकानदार हे क्रिडा संकुल सांगली येथे सुटकेससह थांबून राहिले.

तक्रारदार यांनी त्यांची मो.सा. मिरजच्या दिशेने घेवून मिरज मधून मिरज ते पंढरपूर जाणारे रोडने घेवून मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे बाहेरील रोडवरील टी कॉफी शॉप येथे रोडकडेला पार्क केली. लागलीच आम्ही तक्रारदार व पंच नं.1 पाटील हे थांबले ठिकाणापासून काही अंतरावर आमची कार पार्क करून कार मधून उतरून आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिलो. तसेच अंमलदार चौगुले व जाधव हे देखील त्यांचेकडील मो.सा. वरून टी कॉफी शॉपचे आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिले. त्यानंतर तक्रारदार यांनी कोणास तरी फोन केला असल्याचे दिसले. काही वेळाने गुरव सहा.पोलीस निरीक्षक हे साध्या वेशात मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथून बाहेर चालत येवून टी कॉफी शॉप येथे तक्रारदार यांचेजवळ आले. व तक्रारदार यांचेशी चर्चा करू लागला. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व गुरव हे तक्रारदार यांचे मो.सा. जवळ आले व चर्चा करू लागलेचे दिसले. त्यानंतर गुरव हे निघून जात असताना तक्रारदार यांनी हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला.
लागलीच मी व सापळा पथक असे टी कॉफी शॉप येथे गेलो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोकॉ/पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 20.00 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या. त्यावेळी आम्ही टी कॉफी शॉपचे समोरील रोडवर थांबले गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांचेजवळ गेलो असता त्यांनी त्यांचे हातातील पांढ-या रंगाची पिशवी रस्त्यावर खाली टाकली. त्यावेळी तेथे हजर असले पंच नं.1 पाटील यांनी लोकसेवक गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारून ती पांढ-या रंगाचे प्लॅस्टीकचे पिशवीमध्ये ठेवली असल्याचे सांगितले.

त्यानंतर लागलीच माझे सुचनेप्रमाणे पोह/वाघमोडे व पोकॉ/जाधव यांनी लोकसेवक गुरव यांचे दोन्ही होत मनगटाजवळ घट्ट पकडले. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. त्यावेळी मी लोकसेवक गुरव यांना माझी ओळख सांगितली. त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पंच नं.2 कोकणे यांनी लोकसेवक गुरव यांनी रस्त्यावर टाकले पांढ-या रंगाचे प्लॅस्टीकचे पिशवीची तपासणी केली असता त्यामध्ये लाच रक्कमेचे 500/- रूपये दराच्या नोटांचे एकुण 12 बंडल मिळून आले. सदर लाच रक्कमेच्या बंडलची पंच नं.2 कोकणे यांनी पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. कोकणे यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगीतली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर मी लोकसेवक श्री. गुरव यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली. सदर कार्यवाहीचे पोकॉ/पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या हया टी कॉफी शॉपी चे पाठीमागील खुल्या जागेमध्ये पुर्ण केल्या आहेत.

त्यानंतर मी लोकसेवक श्री गुरव यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सुनिल शिवाजी गुरव, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी सहायक पोलीस निरीक्षक, मिरज ग्रामीण पोलीस ठाणे, वर्ग-2, रा. वंदृ ावन बंगला, विवेकानंद कॉलनी मिरज ता.मिरज जि.सांगली असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही खाजगी इसम नागरगोजे यांचा ठावठिकाणा निश्चित करण्यासाठी तक्रारदार महाडीक यांचे मोबाईलवरून खाजगी इसम नागरगोजे यांना फोन करून त्यांना मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे बाहेरील रोडवरील टी कॉफी शॉप येथे बोलावून घेतले.

त्यानंतर काही वेळाने खाजगी इसम नागरगोजे हे टी कॉपी शॉप येथे दाखल झाले. त्यानंतर आम्ही खाजगी इसम नागरगोजे यांना ताबेत घेवून आमची व सापळा पथकाची ओळख सांगून त्यांना ताबेत घेणेचा उद्देश सांगितला. त्यानंतर मी खाजगी इसम नागरगोजे यांना त्यांचे पुर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. जयवंत ईश्वर नागरगोजे, वय 54, धंदा - शेती, रा. नागरगोजेवाडी, बेडग ता.मिरज जि. सांगली असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक गुरव यांना ताबेत घेवून मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथे सापळा पथकासह दाखल झालो. त्यावेळी आम्ही लोकसेवक गुरव यांना त्याबाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचेविरूध्द मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल केले असलेचे तसेच तक्रारदार यांचेविरूध्दचे हद्दपारीचा प्रस्तावाची कागदपत्रे प्रांत ऑफीस मिरज येथे पाठविले असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पोलीस ठाणेमध्ये सदर कागदपत्रांचा शोध घेतला असता कोणतीही कागदपत्रे मिळून आली नाहीत.

त्यानंतर आम्ही लोकसेवक गुरव व खाजगी इसम नागरगोजे यांना ताबेत घेवून मिरज ग्रामीण पोलीस ठाणे येथून 21.00 वा चे सुमारास रवाना होवून अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे 21.30 वा चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर मी पंच नं. 1 श्री. पाटील यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता पंच नं. 1 यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व तक्रारदार असे त्यांचेकडील मो.सा वरून मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे बाहेरील रोडवरील टी कॉफी शॉप येथे दाखल झालो. त्यावेळी तक्रारदार यांनी गुरव यांना फोन करून पोलीस ठाणेच्या बाहेर बोलावून घेतले. काही वेळाने गुरव साहेब हे टी कॉफी शॉप येथे येवून तक्रारदार यांची भेट घेतली. त्यावेळी तक्रारदार यांनी गुरव यांना "मला काय अडचण नाय ना? असे विचारले असता गुरव यांनी "तुला काय अडचण येत नाय....पोलीस स्टेशनला काय टेन्शन घेवू नकोस मी असे पर्यंत तरी" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "जामीनच तेवढ बघा" असे म्हणाले. त्यावर गुरव यांनी "जामीन जर कॅन्सेल झाला तर तुला अटक करून पुन्हा हजर करायला लागेल" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी त्यांना "त्याला काय प्रोसीजर असत्या" असे विचारले त्यावर गुरव यांनी "तडीपार न करण्यासाठी तुला 110 करून बॉन्ड लिहून घ्यायला लागतोय....... जामीनच पण काय विचार करू नको जास्त......110 का करायच कोर्टाला सांगता येतय प्रतिबंधात्मक कारवाई केल्या म्हणून..." असे म्हणाले.

त्यानंतर गुरव यांनी तक्रारदार यांना "कुठ जायचय का.....का घरी जावुया?" असे विचारले असता तक्रारदार यांनी "नाय...घेवून आलोय......सहाच्या सहा लाख आणलेत" असे म्हणून ते दोघे तक्रारदार यांचे मो.सा.जवळ गेले. त्यावर गुरव यांनी "आणले पण" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी "हो मग" असे म्हणाले. त्यावर गुरव यांनी "ठिक आहे चल" असे म्हणून लाचेची मागणी केल्यानंतर तक्रारदार यांनी मोपेडच्या डिक्कीमधील लाच रक्कमेचा बंडल लोकसेवक गुरव यांचेसमोर धरला असता लोकसेवक गुरव यांनी लाच रक्कमेचा बंडल त्यांचे उजवे हाताने स्विकारून तक्रारदार यांचेकडे पिशवी मागितली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचेकडील पांढ-या रंगाची पिशवी गुरव साहेबांना दिली. त्यावेळी गुरव साहेबांनी लाच रक्कमेचा बंडल त्या पांढ-या रंगाचे प्लॅस्टीकचे पिशवीमध्ये ठेवला. व त्यांचेतील बोलणे झालेनंतर तक्रारदार यांनी बाजूस येवून हातरुमालाने तोंड पूसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला" वगैरे हकीकत सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार श्री. महाडीक यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता त्यांनी पंच नं.1 पाटील यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही अँन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 31/01/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. सुनिल शिवाजी गुरव, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी सहायक पोलीस निरीक्षक, मिरज ग्रामीण पोलीस ठाणे यांनी मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे बाहेरील रोड येथे आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले गुन्हयामध्ये तक्रारदार यांचा पुर्वी मंजुर असलेला अटकपुर्व जामिन नामंजूर करण्यासाठी न्यायालयात पाठविलेल्या अहवालामध्ये मदत करण्यासाठी व तक्रारदार यांचेविरूध्द हद्दपारी प्रस्तावाची अंमल बजावणी न करता प्रतिबंधात्मक कारवाई करून सोडण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 8,00,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 6,00,000/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच खाजगी इसम श्री. जयवंत इश्वर नागरगोजे, वय 54, धंदा - शेती, रा. नागरगोजेवाडी, बेडग ता.मिरज जि. सांगली यांनी भ्रष्ट व गैरमार्गाने तक्रारदार यांचेवर प्रभाव पाडून तक्रारदार यांचे काम लोकसेवक गुरव सहा.पोलीस निरीक्षक यांचेकडून करून देणेची हमी देवून तक्रारदार यांना लाच रक्कम देण्याकरीता प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच दि. 31/01/2026 रोजी लोकसेवक श्री. सुनिल शिवाजी गुरव, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी सहायक पोलीस निरीक्षक, मिरज ग्रामीण पोलीस ठाणे यांचेविरूध्द मिरज ग्रामीण पोलीस ठाणेचे बाहेरील रोडवरील टी कॉफी शॉप येथे सापळा कारवाई केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडून 6,00,000/- रूपये लाच रक्कम स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे. म्हणुन माझी लोकसेवक श्री.सुनिल शिवाजी गुरव, वय - 40 वर्षे, व्यवसाय - नोकरी सहायक पोलीस निरीक्षक, मिरज ग्रामीण पोलीस ठाणे, वर्ग-2, रा. वृंदावन बंगला, विवेकानंद कॉलनी मिरज ता.मिरज जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे व खाजगी इसम श्री. जयवंत इश्वर नागरगोजे, वय 54, धंदा - शेती, रा. नागरगोजेवाडी, बेडग ता. मिरज जि. सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 अ व 12 प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Kiran Vasantrao Chougale(I (Inspector)) / DGPKVCM8201 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Kiran Vasantrao Chc

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPKVCM8201

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Kiran Vasantrao Chougale(I (Inspector)) / DGPKVCM8201 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

श्रीमती यास्मीन शरीफ इनामदार
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
सांगली.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Kiran Vasantrao Chc
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPKVCM8201



(ठाणे अमलदार)
मिरज शहर पोलीस ठाण
जि. सांगली
दि 09/02/2026

Scanned with OKEN Scanner